जय श्री माताजी

अंक 10

श्री निर्मला देवी नमो नमः



तुम्ही एक दिवस अन्न प्राशन करणार नाही
तुम्ही एक दिवस झोप घेणार नाही
तुम्ही एक दिवस कामाला जाणार नाही
रोज करता ते सर्व काही तुम्ही एखाद्या दिवशी करणार नाही
पण ध्यान मात्र तुम्ही रोज केलेच पाहिजे.

- श्री माताजी -

सकाळची प्रार्थना -

मी जे व्हावे असे तुला वाटते ते मी या दिवशी व्हावे
मी जे बोलावे असे तुला वाटते
ते मी या दिवशी बोलावे
या विराटाचा सार-सर्वस्व मी आज व्हावे.
माझे विचार हे आत्मसाक्षात्कारी व्यक्तिचे विचार असावेत.
सर्व मानवजातीबद्दल आज माझ्या मनांत प्रेम असावे.
श्री माताजी, माझ्या हृदयात आणि माझ्या मनांत
आपण वास्तव्य करावे.

प्रार्थना -

आई, कृपावंत होऊन माझ्या हृदयांत ये.
माझे हृदय मला स्वच्छ करूं दे कारण
तिथे तूं आहेस.
तुझे पदकमल माझ्या हृदयांत असूं दे.
तुझ्या पदकमलांची पुजा माझ्या हृदयांत होऊं दे.
मला संभ्रमात ठेवूं नको.
मायेपासून मला दूर ने.
मला वास्तवतेंत राहूं दे.
वरवर देखण्याची चकाकी काढून घे.
माझ्या हृदयांतील 'तुझ्या पदकमलांचा आनंद
मला उपभोगू दे.
तुझे पदकमल माझ्या हृदयांत मला पाहूं दे.

- श्री माताजी.

ध्यानासंबंधी श्री माताजींचा उपदेश

सकाळी उठून तुमचे स्नान करून घ्या. बसा, थोडा चहा घ्या, बोलू नका. सकाळी बोलू नका. बसा. ध्यान करा कारण त्यावेळेस दैवी किरणे येतात. सूर्य नंतर उगवतो. त्याप्रकारे पक्षी उठतात. त्याचप्रकारे फुले उठतात. ते सर्व त्यामुळे जागे होतात आणि जर तुम्ही संवेदनशील असाल तर तुम्हाला समजेल की सकाळी उठल्यामुळे तुम्ही कमीत कमी दहा वर्षांनी तरूण दिसतां. खरोखर सकाळी लवकर उठणे ही इतकी चांगली गोष्ट आहे आणि त्यानंतर आपोआप तुम्ही लवकर झोपता. हे उठण्याबद्दल झाले. झोपण्याबद्दल मी सांगण्याची गरज नाही कारण ते तुम्ही करू शकाल. मग सकाळच्या वेळी तुम्ही नुसतं ध्यान केले पाहीजे.

ध्यानामध्ये स्वतःचे विचार थांबविण्याचा प्रयत्न करा. माझा फोटो उघडया डोळ्यांनी पहा आणि तुमचे विचार थांबतात हे पहा. तुमचे विचार तुम्ही थांबविले पाहिजेत. नंतर तुम्ही ध्यानांत जाता. तुमचे विचार थांबविण्याची सोपी गोष्ट म्हणजे "लॉर्डस प्रेयर" कारण ती स्थिती आज्ञेची आहे. म्हणून सकाळी तुम्ही "लॉर्डस प्रेयर" किंवा श्री गणेशाचा मंत्र आठवा. ते सारखेच आहेत किंवा "मी क्षमा करतो" असेही तुम्ही म्हणू शकता. त्याने कार्य साधतं. मग तुम्ही निर्विचारांत असतां. आतां तुम्ही ध्यान करा. त्यापूर्वी ध्यान नसते. त्यापूर्वी ध्यान नसते, तेव्हा विचार येत असतात किंवा, "मला चहा घ्यायचा आहे", "मी काय करू, आता "मी काय केले पाहिजे" "हा कोण आहे, तो कोण आहे" हे सर्व चालू असतं. म्हणून प्रथम निर्विचार जाणिवेत या. मग अध्यात्मिकतेची वाढ होते. निर्विचारानंतर त्याआधी नाही. हे प्रत्येकाला कळले पाहिजे, तर्कशास्त्राच्या पातळीवर तुम्ही सहजयोगांत वाढू शकत नाही. म्हणून पहीली गोष्ट म्हणजे तुमची निर्विचारतेची स्थिती सिध्द करा. तरीही तुम्हाला थोडेफार चक्रांमधील अडथळे जाणवतील त्यांना विसरून जा. नुसते विसरून जा. आता तुमचे समर्पण चालू करा. आतां एखाद्या चक्रावर पकड असेल तर असे म्हटले पाहीजे "आई" हे मी तुला समर्पित करतो. हया सगळ्या गोष्टी करण्यापेक्षा नुसते असे म्हणायचे. समर्पणाबद्दल तर्क करीत बसावयाचे नाही. अजूनही तुम्ही तर्क करीत, काळजी करीत असाल" मी हे कां करावे, अशी तर ते कधीच कार्यान्वीत होणार नाही. जर तुमच्याकडे निर्मल प्रेम आणि हृदयांत पवित्रता असेल तर ती सर्वांत उत्तम गोष्ट आहे. हे करणे म्हणजेच समर्पण. सर्व काळज्या तुमच्या आईवर सोडा. सर्व काही आईवर सोडा. पण अहंकाराने भरलेल्या समाजाला "समर्पण" ही एक गोष्ट फार कठीण आहे. हे बोलण्यासांठी सुध्दा मला थोडीफार चिंताच वाटते. पण तुमच्या मनांत काही विचार येत असतील किंवा एखाद्या चक्राला पकड असेल तर नुसते "समर्पण" करा. चक्रे साफ झालेली तुम्हाला दिसतील. सकाळच्या वेळी

हे कर, ते कर, असेही करीत जाऊ नका. सकाळच्या वेळी तुमचे हात फार हलवूं नका. ध्यानामध्ये तुमची बहुतेक चक्रे साफ झाल्याचे तुम्हाला समजून येईल.

तुमचे प्रेम तुमच्या हृदयात ठेवा. नुसता प्रयत्न करा आणि तुमचा गुरु हृदयात, त्याच्या आंतल्या गाभा-यात ठेवा. हृदयात प्रतिष्ठापना झाल्यावर पूर्ण भक्ति व श्रध्देने आपण त्याला वंदन केले पाहीजे. साक्षात्कार प्राप्त झाल्यावर जे काही तुम्ही करता, ती तुमची कल्पना सुध्दा ख-या ज्ञानाने प्रकाशित झाली आहे. म्हणून तुमची आई, तुमचा गुरु याच्या चरणकमलांवर तुम्ही विनम्र झाला आहांत अशाप्रकारे स्वतःची योजना करा.

आता ध्यानासाठी योग्य अशी मनःस्थिती मिळावी, किंवा तसे वातावरण मिळावं अशी याचना करा. ध्यान म्हणजे देवाशी एकात्म साधणे.

परमपूज्य श्री माताजींबरोबरचे ध्यान

बुडीकॅम्प येथील संमेलन

18 जून 1988

कृपा करून सर्वांनी डोळे बंद करा. सर्वांनी डोळे बंद करा. आतां, जेव्हां आपण जाहीर कार्यक्रम करतो त्यावेळी सभामंडपात आपण जसे ध्यान करतो त्याप्रकारे आता आपण ध्यान करणार आहोत.

आपण डाव्या बाजूवर काम चालू करू या. डावा हात माझ्याकडे करा. प्रथम तुमचा हात तुमच्या हृदयावर ठेवा. हृदयात शंकराचे वास्तव्य आहे. आत्म्याचे वास्तव्य आहे म्हणून तुम्हाला प्रथम आत्म्याचे आभार मानले पाहिजेत कारण तुमच्या चित्तामध्ये त्याने प्रकाश आणला आहे. याचे कारण तुम्ही संत आहात. आणि तुमच्या हृदयात आलेल्या प्रकाशामुळे सर्व जग प्रकाशित करावयाचे आहे म्हणून आतात तुमच्या हृदयात तुम्ही प्रार्थना करा -

माझ्या दैवी प्रेमाचा प्रकाश जगभर पसरू दे. तुमचे देवाशी संधान साधले गेले आहे, तुम्ही जी इच्छा कराल त्याप्रमाणे होईल, पूर्ण आत्मविश्वास, समज व प्रामाणिकपणा यांनी प्रार्थना करा.

आता तुमचा उजवा हात पोटाच्या वरच्या बाजूला डावीकडे ठेवा. आता इथे तुमच्या धर्माचे केंद्र आहे. इथे अशी प्रार्थना करावयाची -

- विश्व निर्मला धर्माचा प्रसार सा-या जगात होऊ दे.
- आमच्या धार्मिक जीवनामधून, आमच्या सरळमार्गी आयुष्यातून लोकांना प्रकाश दिसू दे.
- लोकांना हे दिसू दे ज्यामुळे त्यांच्यामध्ये ज्ञानाचा प्रकाश पडेल. हितकर उच्चतर जीवन त्यांना लाभेत व प्रगतीची इच्छा होईल असा विश्व निर्मला धर्म त्यांना स्वीकारू दे.

आता तुमचा उजवा हात पोटाच्या खालच्या बाजूला डावीकडे ओटी पोटावर ठेवा. दाबून धरा. हे शुध्द विद्येचे केंद्र आहे. इथे तुम्हाला असे म्हणायचे आहे. सहजयोगी असल्यामुळे आमच्या आईने दैवी कार्य कसे चालते याची पूर्ण कल्पना आम्हाला दिली आहे. आम्ही समजू शकू व धारण करू शकू ते पूर्ण ज्ञान व मंत्र आम्हाला दिले आहेत. त्या सर्वांचे पूर्ण ज्ञान आम्हाला सर्वांना असू दे. मी असे पाहीले आहे की माणूस नेता असला तर त्याच्या बायकोला सहजयोगाचे एक अक्षरही ज्ञान नसते. त्याबद्दल नव-याला काही माहीतही नसते. मला या ज्ञानामध्ये पारंगत व विशेषज्ञ होऊ दे. म्हणजे मी लोकांना आत्मसाक्षात्कार प्रदान करू शकेन. दैवी नियम, कुंडलिनी म्हणजे काय, चक्रे म्हणजे काय हे त्यांना समजावू शकेन.

- ऐहीक गोष्टींपेक्षा माझे चित्त जास्त सहजयोगाकडे असू दे.

आता तुमचा उजवा हात पोटाच्या वरच्या बाजूला ठेवून डोळे बंद करा. आता डाव्या हाताकडील बाजूला दाबा. आईने मला आत्मा दिला आहे. आणि मला माझा स्वतःचा गुरु आत्मा हा आहे. मी स्वतःचा मालक आहे.

भ्रष्टाचार नसूं दे.

माझ्या स्वभावामध्ये सभ्यता असूं दे.

माझ्या वागण्यांत औदार्य असू दे.

इतर सहजयोगींविषयी प्रेम व ममता असू दे.

मी नुसता दिमाख दाखवू नसे पण ईश्वरी प्रेम व कार्य याबद्दल सखोल ज्ञान मला असू दे. जेव्हा लोक माझ्याकडे येतील त्यावेळी त्यांना सहजयोगाबद्दल मी सांगू शकेन व हे अपूर्व ज्ञान, प्रेम व दया बुध्दीच्या योगे मी त्यांना प्रदान करू शकेन.

आता तुमचा उजवा हात हृदयावर ठेवा. इथे तुम्हाला आनंदाच्या सागराची क्षमेच्या सागराची जाणीव झाली. आपल्या आईची क्षमा करण्याची अमर्याद क्षमता समजली याबद्दल परमेश्वराचे आभार मानायचे आहेत.

माझे हृदय विशाल होऊ दे आणि पूर्ण विश्व वेढून टाकू दे. माझ्या प्रेमांतून ईश्वराच्या नावाचा प्रतिध्वनी येऊ दे.

आता तुमचा उजवा हात, मान व खांदा यांच्यामधील कोप-यांत डावीकडे विशुध्दीच्या ठिकाणी ठेवा.

दोषीपणाच्या खोटया भावनेच्या आहारी मी जाणार नाही कारण हे सर्व मिथ्या आहे हे मला माहीत आहे.

माझ्या चूकांपासून मी पळवाट शोधणार नाही तर त्यांना तोंड देइन व त्यांना समूळ नष्ट करीन.

इतरांच्या चूका मी शोधणार नाही. पण माझ्या सहजयोगाच्या ज्ञानाला अनुसरून त्यांच्या चुका मी काढून टाकीन. दुसऱ्यांच्या चुका गुपचुन सुधारण्याचे अनेक मार्ग आपल्याकडे आहेत.

माझी सामूहीकता इतकी उच्चतेला पोहोचू दे की पूर्ण सहजयोग ही माझी स्वतःची मुले, स्वतःचे कुटुंब, स्वतःचे घर, स्वतःचे सर्व काही होऊ दे.

आम्हा सर्वांची एकच आई आहे. त्यामुळे मी पूर्णत्वाचा एक भाग, अंश आहे ही संवेदना पूर्णपणे माझ्या अंतर्यामी असू दे. पूर्ण विश्वाचे काय प्रश्न आहेत हे समजून घेऊन माझ्या इच्छा शक्तिने ते सोडवणे याबद्दल मला आस्था असू दे.

जगाचे प्रश्न माझ्या हृदयाने जाणून घ्यावे व ज्या कारणांमुळे ते निर्माण झाले त्यांचा समूळ नाश नैसर्गिकरित्या व्हावा.

या सर्व प्रश्नांच्या मुलभूत तत्वापर्यंत मला पोहोचू दे आणि माझ्या सहजयोगाच्या शक्तिने त्यांना नष्ट करण्याचा प्रयत्न करू दे.

आता तुमचा उजवा हात कपाळावर आडवा ठेवा. आता इथे तुम्हाला प्रथम म्हटले पाहिजे - जे सहजयोगात आले नाहीत त्या सर्वांना मी क्षमा केली पाहीजे जे कडेला आहेत, जे येतात आणि जातात, जे आंतबाहेर उड्या मारतात त्यांना मी क्षमा करतो. पण सर्वप्रथम आणि आधी सर्व सहजयोग्यांना मी क्षमा करतो कारण ते माझ्यापेक्षा चांगले आहेत. मी एकटाच सर्वांच्या चुका शोधू पाहतो पण मी सर्वात खालच्या टोकाला आहे आणि मला त्यांना क्षमा केली पाहिजे. कारण मला अजून खूप पुढे जायचे आहे हे मला समजले पाहीजे. आता मी खूप खाली आहे. मला स्वतःला खूप सुधारावयाचे आहे.

ही विनयशीलता आपल्यामध्ये आली पाहीजे म्हणून तुम्हाला इथे असे म्हणायला हवे -

माझ्या हृदयांत खरोखरी नम्रता असू दे. दांभिकता नको.

ही क्षमेची भावना कार्यान्वित करा. ज्यामुळे सत्य, सहजयोग व परमेश्वर यांना मी वंदन करेन.

आता तुमचा हात डोक्याच्या मागील बाजूवर ठेवा. डोके मागे कलते करा. आणि आता असे म्हणा -

श्री माताजी, आत्तापर्यंत ज्या काही चुका आम्ही केल्या आहेत, आमच्या मनांत ते चूकीचे विचार येतात, जी क्षुद्रता तुमच्याबाबत आम्ही दाखविली आहे, आम्ही तुम्हाला अनेक

प्रकारे जो त्रास दिला आहे, आव्हान केले आहे त्याबद्दल आम्हाला क्षमा करा.

तुम्ही क्षमा मागितली पाहीजे. तुमच्या बुध्दीने मी कोण आहे हे तुम्हाला कळले पाहिजे. मला तुम्हाला परत परत सांगण्याची पाळी येता नये. सहस्त्रारावर तरी नाही. सहस्त्रारावर तुम्ही माझे आभार मानले पाहीजेत. तुमचा हात सहस्त्रारावर ठेवा. सात वेळा फिरवा. सात वेळा माझे आभार माना.

श्री माताजी आत्मसाक्षात्कार दिल्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत.

श्री माताजी आम्ही किती महान आहोत हे आम्हाला समजावून दिल्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत. सर्व दैवी आशिर्वाद आणल्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत. आम्हाला आम्ही जिथे होतो त्याच्या खूप वर नेल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. आम्हाला आधार दिला, सुधारणा केल्या, आम्हाला ठीक केले याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

आणि शेवटी परत एकदा आम्ही आपले आभारी आहोत. कारण तुम्ही या पृथ्वीवर आलात, जन्म घेतलात, आम्हां सर्वांसाठी इतके काम करीत आहात.

दाबून धरा आणि जोरात फिरवा. आता हात खाली घ्या. डोकी अजूनही गरम आहेत तर आता स्वतःलाच चांगले बंधन देऊ या. आईच्या बंधनामध्ये स्वतःला डावीकडून उजवीकडे घेऊ या. एक चांगल्या त-हेने तुम्ही काय आहात हे समजून घ्या. तुमची वलये काय आहेत. आता दूसरे, आता तिसरे, आता चौथे, आता पाचवे, आता सहावे, आता सातवे.

आता तुमची कुंडलिनी वर करा, हळू, अगदी हळू, तुम्हाला हे अगदी हळू केले पाहिजे. आता डोके मागे घेऊन गाठ बांधा. एक गाठ, दूसरी गाठ. आता अगदी हळू करू या. तुम्ही संत आहात. व्यवस्थित करा. घाईत नको. डोके मागे करा. तिथे दोन गाठी बांधा. एक आणि दोन. आता परत तिसरे करू या. आता तिस-याला तुम्हाला तीन गाठी बांधायला हव्यात. खूप सावकाश करा. अगदी हळू. आता व्यवस्थित करा. आता तुमची व्हायब्रेशन्स पहा. तमुची व्हायब्रेशन पहा. अशाप्रकारे, सगळ्या मुलांनी अशी व्हायब्रेशन्स पहा. हात पुढे करा. छान. मला तुमच्याकडून व्हायब्रेशन्स येत आहेत.

ईश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो. मी तुमची आभारी आहे.

## श्री महादेवीची 108 नावे

ललिता सहस्त्रनामामधील महादेवीच्या 1000 नावांपैकी 108 नावे इथे दिली आहेत. ही महान देवी एकाच वेळी, साधी, लहान मुलाप्रमाणे अबोध, अधांग, सर्वव्यापी, पूर्णपणे चकवणारी,

आकलनाच्या सर्व वर्गवारींच्या पलीकडे, सर्व माहीत असलेल्या व माहीत नसलेल्या विश्वात आहे. ही नावे तिच्या क्षेत्रातील काही अंगे दर्शवितात. तिची पूजा केली पाहिजे.

चित्त श्री माताजी निर्मलादेवी यांच्याकडे ठेवून ही नावे पुढील मंत्राच्या योगे म्हणू शकता.

"ओम् साक्षात श्रीमाता नमो नमः"

ओम् जी खरोखर पवित्र माता आहे तीला आम्ही वंदन करतो.

"ओम् साक्षात श्री महाराज्ञी नमो नमः"

ओम जी खरोखर महाराणी आहे तिला आम्ही वंदन करतो.

या मंत्रांनी आपल्याला आठवण झाली पाहीजे की हृदयापासूनची भक्ति व पूजा यामुळेच श्री माताजी निर्मलादेवींच्या ख-या स्वरूपाचा उलगडा होतो.

दयासागर अशा त्यांनी आपल्या सर्वांना आशिर्वाद द्यावे.

श्रीमाता - पवित्र माता. प्रेमळ आई, जी स्वतःच्या मुलाला प्रत्येक चांगली गोष्ट देते. एवढेच नाही तर उच्चतम ज्ञान, ब्रम्हविद्या, दैवी व्हायब्रेश्नसचे ज्ञान स्वतःच्या भक्तांना देते.

श्री महाराज्ञी महान राणी

देवकार्यसमुद्यता दैवी हेतूसाठी अवतरलेली. सर्व दैवी शक्त्या दुष्ट शक्तिंचे निर्मूलन करण्यास असमर्थ, हतबल होतात. त्यावेळी स्वतःच्या महान तेजस्वितेत प्रकटणारी.

अकुला जी मूल्यमापनाच्या पलीकडे आहे, कुळापलीकडे म्हणजे जी डोक्यामध्ये सहस्त्रारामध्ये राहाते.

विष्णुग्रंथी-विभेदिनी श्री विष्णुच्या मायेची गाठ जी सोडविते. भक्ताचा मर्यादीत अहंपणा गळून पडतो. स्वतःची बुध्दी, मन, शरीर यांचे मिथ्या स्वरूप त्याला समजते.

भवानी भवांची राणी. म्हणजेच शिव. सर्व विश्वाला जीवन देणारा.

भक्तिप्रिया भक्त आवडणारी.

भक्तिगम्या भक्तिमुळे ती आपल्याला मिळू शकते.

शर्मदायिनी आनंद दायिनी यांत परमानंदाचा समावेश आहे.

निराधारा आधार नसलेली. तीच विश्वाचा आधार आहे. ती शुध्द जाणीव, अभेद्य, अविभाजीत, आहे.

निरंजना कुठल्याही डागाने कलंकित न झालेली.

| | |
|---|---|
| निर्लेपा | वेगवेगळ्या कर्मांचा किंवा द्वैताचा जिला स्पर्श होत नाही ती. |
| निर्मला | शुध्द |
| निश्कलंका | कलंक नसलेले तेज असणारी |
| नित्या | सदैव |
| निराकारा | आकार नसलेली |
| निराकुला | न त्रासणारी |
| निर्गुणा | गुण नसलेली म्हणजेच तीन गुण व तीन नाडया {इडा, पिंगला व सुषुम्ना} यांच्या पलीकडील मनाचे वेगवेगळे विकार व गुण ज्यामध्ये नाहीत ती जाणीव. |
| निष्कला | अविभाज्य, पूर्ण |
| निष्कामा | जिला इच्छा नाही, जिच्याकडे सर्व काही आहे. |
| निरुपप्लवा | जिचा नाश करता येत नाही. |
| नित्यमुक्ता | नेहमी मुक्त असलेली आणि तिचे भक्तही नेहमीच मुक्त असतात. |
| निर्विकारा | जी बदलत नाही पण प्रत्येक बदलामधील न बदलणारा भाग आहे. |
| निराश्रया | जिला आश्रय नाही कारण तीच सर्वांचा आधार आहे. |
| निरंतरा | अभिन्न |
| निष्कारणा | कारण नसलेली. जी सर्वांचे कारण आहे ती. |
| निरुपाधि | एकटी, माया जी सर्व द्वैताचे कारण आहे तिच्याशिवाय असलेली. |
| निरीश्वरा | सर्वश्रेष्ठ |
| निरागा | कुणालाही बांधलेली नसलेली. |
| निर्मदा | गर्व नसलेली |
| निश्चिंता | कसलीही चिंता नसलेली. |
| निर्मोहा | कोणत्याही मायेत नसलेली {म्हणजे मिथ्या गोष्टीला सत्य समजणे} |
| निर्ममा | आप्पलपोटीपणा नसलेली. |
| निष्पापा | पापम् म्हणजे अज्ञान किंवा अविद्या ही तिच्याकडे नाही. |
| निःसंशया | संशय नसलेली |
| निर्भवा | न जन्मलेली |
| निर्विकल्पा | जिच्याकडे मनाचे खेळ नाहीत. |
| निराबाधा | त्रास - बाधा नसलेली |

| | |
|---|---|
| विनीशा | मृत्यू नसलेली |
| निष्क्रीया | सर्व क्रियांच्या पलिकडची , कुठल्याही क्रियेत नसणारी. |
| निष्परिग्रहा | काही न घेणारी कारण तिला काही लागत नाही. ती पूर्णकाम आहे किंवा तिच्याकडे सर्व काही आहे. भक्तसुध्दा निष्परिग्रही होतात. |
| निस्तुला | जिची तुलना करता येत नाही. |
| नीलचिकुरा | काळे केस असलेली. |
| निरापाया | अपायाच्या पलिकडील, भयाच्या पलिकडील |
| निरात्यया | जिला ओलांडणे, विरूध्द जाणे कठीण जाते. |
| सुखप्रदा | सुख किंवा आनंद देणारी किंवा मोक्ष देणारी जो मुक्तिचा परमानंद आहे. |
| सांद्रकरूणा | तिच्या भक्तांसाठी अत्यंत करूणामय असलेली. |
| महादेवी | महान देवी, अमर्यादित |
| महापुज्या | उच्चतमांनी पुजीलेली म्हणजे त्रिमुर्ति, ब्रम्हा, विष्णु, शिवानी |
| महापातकनाशिनी | महान पापांचा नाश करणारी |
| महाशक्ति | महान शक्ति |
| महामाया | देवांनाही गोंधळून टाकणारी, माया तयार करणारी महान कर्ती |
| महारति | परमानंद जो सर्व इंद्रियांनी मिळणा-या आनंदाच्या पलिकडे आहे. |
| विश्वरूपा | विश्व हे तीचे रूप आहे. तसेच जागृतावस्थेत व्यक्तिशः विश्व हेही तिचे स्वरूप आहे. |
| पद्मासना | कमलांमध्ये बसलेली म्हणजे चक्रांमध्ये |
| भगवती | विश्वाचा सांचा देवांसकट सर्व जिची पूजा करतात. |
| रक्षाकरी | रक्षण करणारी |
| राक्षसघ्नी | दुष्ट शक्त्या - जे राक्षस आहेत त्यांना नाश करणारी. |
| परमेश्वरी | सर्वोच्च राज्यकर्ती |
| नित्ययौवना | सदैव यौवनात असणारी. तिचीच निर्मिती असल्याने काल तिला स्पर्श करू शकत नाही. |
| पुण्यलभ्या | प्रामाणिक व गुणवंतांना मिळणारी. पूर्वजन्मीच्या पुण्यांमुळे तिची भक्ति केली जाते ती. |
| अचिंत्यरूपा | मन जे विचार करण्याचे साधन आहे ते तिची निर्मिती असल्याने विचारांमुळे न लाभणारी |

| | |
|---|---|
| पराशक्ति | सर्वोच्च शक्ति. प्रत्येक अणूमध्ये तसेच आदि व्हायब्रेशन्समध्ये प्रगटित होणारी शक्ति. |
| गुरुमुर्तिः | गुरुची मुर्ति. प्रत्येक गुरु म्हणजे स्वतःच देवी असते. |
| आदिशक्तिः | आदिशक्ति. प्रथम कारण असल्यामुळे. |
| योगदा | योद देणारी, व्यक्तिचा आत्मा {जीवात्मा} व परमात्मा विश्वाचा आत्मा यांचा संयोग घडवणारी. |
| एकाकिनी | एकटी. विश्वातील द्वैत्याचा पाया असणारी. अद्वैत. |
| सुखाराध्या | शरीराला जास्त त्रास न देता अंतरयोगाने जिची आरामात पुजा करतो येते ती |
| शोभना-सुलभागतिः | आत्मसाक्षात्काराचा सर्वात सोपा मार्ग. |
| सत्‌चितआनंदरुपिणी | सत् म्हणजे पूर्ण सत्य, चित्त म्हणजे जाणीव. आनंद म्हणजे परमानंद हे तीन परमात्म्याचे भाग आहेत. त्यामुळे ही तिची रुपे आहेत. |
| लज्जा | सलज्ज, विनयशील पावित्र्य |
| शुभंकरी | शुभ करणारी, आत्मसाक्षात्कार देणे हे सर्वात चांगले आणि ते ती भक्तांना देते. |
| चण्डिका | दुष्ट शक्तिंना रागवणारी. |
| त्रिगुणात्मिका | जेव्हा निर्मिती होते त्यावेळी ती तीन गुणांची, {सत्वगुण, रजोगुण, तमोगुण} रुपे घेते. जी मानवी शरीरांमध्ये स्वयंचलित मज्जासंस्थेच्या तीन नसांप्रमाणे आहेत. |
| महती | भक्ति व चित्ताचे अतुलनीय, महान आणि सर्वोच्च ध्येय. |
| प्राणरुपिणी | प्राणवायुचे रुप अशी. |
| परमाणुः | सर्वात लहान अणू. इतका लहान की समजण्यास कठीण. |
| पाशहंत्री | जी पाश, लगामांचा नाश करुन - मुक्ती किंवा मोक्ष देते. |
| वीरमाता | वीर म्हणजे दुष्ट शक्तींशी लढाई करणारे तुल्यबळ नेते होऊ शकतील असे भक्त त्यांची आई. श्री गणेशांचे सुध्दा एक नाव "वीर" असे आहे. |
| गम्भीरा | अथांग गहनता असणारी. पुराणात आदिमातेचे वर्णन काल व गति यांच्या आकलनाबाहेर असणारी, जाणिवेचे अथांग सरोवर असे केले आहे. |
| गर्विता | अभिमानी, विश्वनिर्मिती म्हणून. |
| क्षिप्रप्रसादिनी | भक्तांवर खूप लवकर अमृताचा वर्षाव करणारी. |

| | |
|---|---|
| सुधाश्रुतिः | सहस्त्रारावर जिचे ध्यान केले असता अमृत किंवा परमानंदाच्या धारा वाहतात. ती महान देवी. |
| धर्माधारा | धर्म म्हणजे प्रत्येक युगामध्ये परंपरागत चालत आलेले योग्य वर्तणुकीचे नियम. त्या धर्माची आधारभूत अशी ती. |
| विश्वग्रासा | प्रलयकाळी {सर्वनाशाच्या वेळी} विश्व गिळून टाकणारी. |
| स्वस्था | स्व म्हणजे स्वतः स्था म्हणजे स्थित झालेली, राहिलेली स्वतःमध्ये राहणारी त्याप्रमाणे ती भक्तांमध्ये पण राहते. |
| स्वभावमधुरा | नैसर्गिक गोडवा म्हणजे आनंद. ती भक्तांच्या हृदयांत शाश्वत सुख होऊन राहते. |
| धीरसमर्चिता | शूर व ज्ञानी मंडळींनी पूजिलेली. याचा अर्थ भित्र्या व मूर्ख लोकांना तिची पूजा करता येत नाही. |
| परमोध्दारा | महान औदार्य असलेली. तिच्या भक्तांच्या प्रार्थनेला तावडतोब उत्तर देणारी. |
| शाश्वती | नेहमी हजर असणारी, सतत. |
| लोकातीता | सर्व लोकांच्या पलिकडची सहस्त्रारावर तिचे स्थान आहे. |
| शमात्मिका | शांती हे तिचे मूलतत्व आहे. मनःशांती असलेले भक्त हे तिचे घर आहे. |
| लिलाविनोदिनी | विश्व ही तिची क्रिडा आहे. निर्मितीची पूर्ण क्रिया हा तिचा खेळ आहे. |
| श्री सदाशिव | सदाशिवाची पवित्र भार्या. |
| पुष्टि | भरणपोषण. जीवाला दैवी व्हायब्रेशन देऊन तिचे पोषण तीच करते. |
| चंद्रनिभा | चंद्राप्रमाणे तेजस्वी. |
| रविप्रख्या | सूर्याप्रमाणे तेजस्वी. |
| पावनाकृति | पवित्र रूप. सर्व पातकांना धुऊन टाकणारे सर्वात शुध्द. |
| विश्वगर्भा | पूर्ण विश्व तिच्यामध्ये आहे कारण ती विश्वाची माता आहे. |
| चित्शक्तिः | अज्ञान व भ्रम काढून टाकणारी जाणिवेची शक्ति. |
| विश्वसाक्षिणी | विश्वाच्या क्रियांची मूक साक्षीदार. |
| विमला | स्वच्छ, शुध्द, स्पर्श न झालेली. |
| वरदा | त्रिमूर्तिना वर देणारी |
| विलासिनी | तिच्या सुखासाठी हे विश्व आहे किंवा तिच्या सुखासाठी ती आत्म साक्षात्काराचा मार्ग उघडते किंवा बंद करते. |

| | |
|---|---|
| विजया | सर्व कृतिंमधील विजयांचे अंग. |
| वन्दारु जन वत्सला | तिच्या भक्तांवर तिच्या मुलांसारखे प्रेम करते. |
| सहजयोग-दायिनी | क्षणार्धात सहज आत्मसाक्षात्कार देणारी. |

श्री माताजींचा नवरात्री पूजेचा संदेश प्रतिष्ठान 1988

पूजा कशाप्रकारे करावी

पूजेचा दृष्टिकोन असा असला पाहिजे की तुम्ही देवीमुळे मोहून गेला आहात आणि तुम्ही तिची स्तुति करीत आहात. हा बुध्दीचा व्यायाम नाही. तुम्ही खुष करण्यासाठी या सर्व गोष्टी सांगता. जसे तुम्ही कोणावर प्रेम करीत असाल तर त्या व्यक्तिला फक्त खुष करण्यासाठी तुम्ही बोलता त्याप्रकारे तुम्ही देवीशी बोलत आहात.

या गोष्टी स्वतःला व्यक्त करण्यासाठी संतांनी लिहील्या होत्या की "आपण देवी आहात. अशा आहात. तशा आहात. मला मिळणारी काही पत्रे सुध्दा अशी असतात. त्यांच्या भावना पूर्णपणे व्यक्त करणारी. पण हा काही भाषणाचा कोर्स वगैरे नाही. ही दृष्टीकोनाची जाणीव आहे. तर पूर्ण भक्तीमध्ये हे सर्व केले पाहिजे.

पूर्ण विनम्रतेने तुमच्या हृदयात ही जाणीव ठेवा. हे प्रार्थनेसारखे व्यक्त स्वरूप आहे0 ही प्रार्थना आहे. ही प्रार्थना असली पाहिजे. ही काही बुध्दीवादींची चर्चा नाही. ही देवीची प्रार्थना आहे. हा दृष्टिकोन तुम्ही तयार केल्याशिवाय तुम्ही जास्त दूर जाऊ शकणार नाही.

हृदयापासून पूर्णपणे ओतले पाहीजे. तुमचे हृदय उघडा. तुमच्या प्रार्थनेमध्ये पूर्णपणे ओता. विश्लेषण करण्यासारखे तिथे काही नाही. हृदयापासून ते आले नाही तर तुम्ही जे बोलता ते फक्त तोंडदेखले आहे. तुमचे हृदय प्रकाशित करण्यास.ठी देवीची स्तुती केली पाहीजे. अशाप्रकारे व्यक्त करा की तुम्हाला या गोष्टी सांगाव्याशा वाटल्या पाहिजेत. या सर्व गोष्टी सांगत असताना तुम्हाला त्यांच्याशी एकरूप झाले पाहीजे.

तुम्ही जेव्हा फोटोसमोर ध्यान करता त्यावेळी फोटो तुमच्या हृदयात ठेवण्याचा प्रयत्न करा, आई मी तुझ्यावर प्रेम करतो. कृपा करून माझ्या हृदयात ये असे म्हणा. या हृदयामध्ये सर्व बुध्दी आहे. सर्व कर्तृत्व आहे. हृदयांतून सर्व काही जन्माला येते. पण तुम्ही हृदय बंद केले तर मेंदू विचलित होतो. व तुम्ही हृदयाच्या बाहेर जाता. हृदय जे आत्म्याचे सिंहासन आहे ते सर्वांना काबूत ठेवते. स्वयंचलित मज्जासंस्था, सिंपथेटिक, पॅरासिंपथेटीक उत्क्रांती ज्ञान, सव काही, त्यामुळे पहीली गोष्ट म्हणजे तुमचे हृदय तयार करा.